MHYA100005222025

दाखल तारीख :— १९/०३/२०२५
दाखल तारीख :— १९/०३/२०२५
निकाल तारीख :— ०४/०६/२०२६
कालावधी:— **० वर्ष ०८ महिने १६ दि.**

## न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, केळापूर यांचे न्यायालयात (पिठासीन अधिकारी सायमा एन.ए.एस.शेख)

**संक्षिप्त फौजदारी ख.क्र. २५७/२०२५ निशानी क्र. २७**

**अभियोगपक्ष** :— महाराष्ट्र शासन तर्फे
पोलीस स्टेशन अधिकारी,
पांढरकवडा, ता.केळापूर
जिल्हा यवतमाळ.

**—वि—**

**आरोपी** :— **१. सिध्दार्थ दामोदर कांबळे,**
वय २८ वर्ष, व्यवसाय — शेती,
रा. सायखेडा ता. केळापुर जि. यवतमाळ
**२. अनुप महादेव राठोड,**
वय २९ वर्ष, व्यवसाय — शेती,
रा. वागद ता. केळापूर जि. यवतमाळ
**३. ऋषीकेश गुलाब कवाडे,**
वय ३४ वर्ष, व्यवसाय — शिक्षण,
रा. सायखेडा ता. केळापुर जि. यवतमाळ
**४. रोशन प्रभाकर गुरनुले,**
वय ३४ वर्ष, व्यवसाय — मजुरी,
रा. सायखेडा ता. केळापुर जि. यवतमाळ
**५. आकाश तानबा सोनुले,**
वय ३० वर्ष, व्यवसाय — शिक्षण,
रा. सायखेडा ता. केळापुर जि. यवतमाळ

**महाराष्ट्र जुगारबंदी अधिनियमाचे कलम १२ (अ) अंतर्गत खटला**

.....................................................................................

**श्री. एस.बी.जगताप, अभियोग पक्षातर्फे सरकारी अभियोक्ता**

**श्री. एस.सी. बोरले आरोपींतर्फे वकील**

.....................................................................................

| | |
|---|---|
| अपराध घडल्याचा दिनांक (Date of Offence) | ०८/१२/२०२४ |
| प्रथम खबरी अहवालाचा दिनांक (Date of FIR) | ०८/१२/२०२४ |
| दोषारोपपत्र दाखल केल्याचा दिनांक (Date of charge-sheet) | १९/०३/२०२५ |
| दोषारोप / प्रतीकथन नोंदविल्याचा दिनांक (Date of framing of Charge) | १५/१२/२०२५ |
| पुरावा सुरु झाल्याचा दिनांक (Date of Commencement of evidence) | १९/०१/२०२६ |
| न्यायनिर्णय राखुन ठेवल्याचा दिनांक (Date on which judgment is reserved) | ०३/०६/२०२६ |
| न्यायनिर्ण दिल्याचा दिनांक (Date of the judgment) | **०४/०६/२०२६** |
| शिक्षा दिल्याचा दिनांक (Date of the sentencing Order, if any.) | **निर्दोष** |

| अ. क्र. ;Rank of the accused) | आरोपीचे नांव (Name of Accused) | अटक केल्याचा दिनांक (Date of Arrest) | जमानतीवर सोडल्याचा दिनांक (Date of Release on Bail) | कलम (Offences charged with) | मुक्तता अथवा शिक्षा (Whether acquitted or convicted) | शिक्षा (Sentence imposed) | न्यायाधीन बंदी असलयाची तारीख कलम ४२८ प्रमाणे (Period of Detention Undergone during Trial for purpose of Section 428 Cr.P.C.) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १<br>२<br>३<br>४ | **सिध्दार्थ दामोदर कांबळे,**<br>**अनुप महादेव राठोड,**<br>**ऋषीकेश गुलाब कवाडे**<br>**रोशन प्रभाकर गुरनुले,** | सुचनापत्रवर सोडण यात आले. | १५/१२/२०२५ | महाराष्ट्र जुगारबंदी अधिनियमाचे कलम १२(अ) | निर्दोष मुक्तता | लागु नाही | लागु नाही |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ५ | **आकाश तानबा सोनुले** | | | | | | |

## न्यायनिर्णय

(दिनांक. **०४/०६/२०२६** रोजी घोषीत)

उभयपक्षांचा युक्तीवाद ऐकला. अभियोग पक्षाचे कथन,आरोपीने घेतलेला बचाव अभिलेखावर असलेला पुरावा या सर्व परीस्थीतीचा सारासार विचार केला असता खालील बाबी माझे विचाराधिन उपस्थिती होतात. त्यावरील निष्कर्ष कारणमिमांसेसहीत खालीलप्रमाणे.

३. आरोपी विरूध्द गुन्हा दर्शविणारा कोणताही पुरावा अभिलेखावर उपलब्ध न झाल्यामुळे फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम ३१३ (१) (ब) अन्वये आरोपीचा बयान नोंदविण्यात आला नाही.

| अ. क्र | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | अभियोग पक्षाने हे सिध्द केले काय की दिनांक ०८/१२/२०२४ रोजी १६.०० वाजता ग्राम साय खेडा, ता. केळापुर जि. यवतमाळ येथे पडोळे यांचे शेतातील पडीत सार्वजनिक जागेवर आरोपी क्र. १ ते ५ हे ५२ पत्यांचा हारजीतचा एक्का बादशहा नावाचा जुगार खेळतांनी मिळुन आले व मुंबई जुगार अधिनियम कायदा कलम १२ अ प्रमाणे गुन्हा केल्याचे अभियोग पक्ष सिध्द करतो का? | ...नकारार्थी |
| २. | अंतिम आदेश ? | ...अंतिम आदेशाप्रमाणे |

## करणमिमांसा

**मुद्दा क्र. १** :—

४. आरोपी विरूध्द असलेला आरोप सिध्द करण्यासाठी अभियोग पक्षातर्फे दिनेश दिपक देवकर यास सरकारी साक्षीदार क्रं. १ प्रमाणे तपासले. तो अभियोग पक्षाचा जप्ती पंचानाम्यावरील कथित साक्षीदार असुन त्यांनी सरकार पक्षाचे खटल्याचे समर्थन केले नाही. त्यांनी कथित जप्ती पंचनाम्यातील हकीकत निक्षुन नकारलेली आहे. अशा परिस्थितित सरकारी वकीलांनी त्यांची उलट तपासणी घेतली परंतु सरकार पक्षाचे खटल्याचे समर्थन होईल असा पुरावा सरकार पक्ष आणु शकले नाही. सरकारी अभियोक्ता श्री एस. बी. जगताप यांनी अभिलेखानुसार युक्तीवाद केला. आरोपीचे वकील श्री. ए.सी. बोरले यांनी आरोपी विरूध्द काहीही निष्पन्न होत नसल्याचा युक्तीवाद केला.

५. सदर युक्तीवादाच्या अनुषंगाने तसेच वर नमुद साक्षीदाराची साक्ष विचारात घेता असे निदर्शनास येते की साक्षीदार क्र. १ दिनेश दिपक देवकर यांनी जप्ती पंचनामा या वरील दिनांक ०८/१२/२०२४ रोजी केलेली सही वगळता इतर कुठलाही मजकुर सिध्द केलेला नाही. त्यामुळे जप्ती पंचनामा सिध्द झाला असे म्हणता येणार नाही. त्याचप्रमाणे अभियोग पक्षाने साक्षीदाराच्या सरतपासातही अभिलेखावर आरोपी विरूध्द गुन्हा साबीत होईल असे काहीही आणले नाही.

६. तसेच सरकारी साक्षीदार क्र. २ सुनिल अण्णाजी भांडेकर यांनी त्यांच्या पुराव्यात असू सांगीतले आहे की, पोलीसांनी त्यांना कुठेही बोलाविले नव्हते. तसेच त्यांना सुचनापत्र देखील देण्यात आले नव्हते. तसेच त्यांनी पुढे असे कथन केले आहे की, पोलीसांनी त्यांच्या समक्ष कुढलाही घटनास्थळ पंचनामा करुण आरोपीच्या ताब्यातुन काहीही जप्त केले नाही. तसेच त्यांनी अभियोग पक्षाने विचारलेली सर्व उत्तर सुचक प्रश्न नाकारुण घ टनेबददल त्यांना काहीही माहीत नसल्याचे कथन केले आहे.

७. सदर प्रकरणात साक्षिदारांची साक्ष विचारात घेतली असता अभिलेखावर दाखल केलेले दस्ताऐवज सिध्द झाले नाही. अभियोग पक्षाने सदर आरोपी हाकथित घटनेच्या वेळी सायखेडा

येथे पडोळे यांचे शेतातील पडीत सार्वजनिक जागेवर आरोपी क्र. १ ते ५ हे ५२ पत्यांचा एक्का बादशहा नावाचा हारजीतचा जुगार खेळताना मिळुण आले व त्यांची अंगझडती घेतली असता त्यांच्याकडुण एकुण नगदी ३,५६,५१०/— रु.चा मुद्देमाल जप्त करण्यात आले. या बाबत कुठलाही पुरावा अभिलेखावर सादर केलेला नाही. त्यामुळे मी अशा निष्कर्षावर आले आहे की अभियोग पक्ष आरोपींवरील दोषारोप सिध्द करू शकले नाही. म्हणुन मी मुददा क्र. १ चे उत्तर नकारार्थी देते.

<u>**मुद्दा क्र.२ः—**</u>

८. मुददा क्र. १ च्या नकारार्थी उत्तरामुळे आरोपी हे दोषमुक्त करण्यास पा्त्र आहे. जप्त करण्यात आलेल्या रकमेवर आरोपी यांनी दावा केलेला नाही जप्त करण्यात आलेली वरली मटका चिठ्ठया, कार्बन, बॉलपेन पेन इत्यादी साहित्य हे निरूपयोगी असल्याने ते अपील कालावधी संपल्यानंतर नाश करण्यात यावी व जप्त करण्यात आलेली एकुण नगदी रक्कम रुपये ३४,०००/— रूपये सरकार खाती वर्ग करणे योग्य होईल म्हणुन मी मुद्दा क्र. २ च्या उत्तरार्थ खालील आदेश पारीत करते.

## <u>आदेश</u>

१) आरोपी क्र. १. सिध्दार्थ दामोदर कांबळे, आरोपी क्र. २.अनुप महादेव राठोड, आरोपी क्र. ३.ऋषीकेश गुलाब कवाडे, आरोपी क्र. ४. रोशन प्रभाकर गुरनुले व आरोपी क्र. ५.आकाश तानबा सोनुले यांना फौजदारी प्रक्रीया संहितेच्या कलम २५५(१) अन्वये मुंबई जुगार प्रतिबंधक कायदा कलम १२ (अ) या आरोपातुन दोष मुक्त करण्यात येत आहे.

**२)** फौजदारी प्रकिया संहितेचे कलम ४३७—अ प्रमाणे आरोपी यांचे बंधपत्र व जामीनपत्र सहा महिण्यासाठी कायम ठेवण्यात येते.

३) या प्रकरणातील मुददेमाल म्हणजे एक बॉलपेन पेन व वरली मटका साहित्य हे निरूपयोगी असल्याने अपील

कालावधी संपल्यांनतर नाश करण्यात यावी.

४) जप्त करण्यात आलेली रोख रक्कम रुपये ३४०००/— कुणीही मागणी केलेली नसल्यामुळे शासन जमा करण्यात यावी.

५) गुन्हयात जप्त करण्यात आलेली मोटर सायकल व मोबाईल फोन सुपुर्तनाम्यावर सोडल्यामुळे सदर आदेश कायम ठेवण्यात येते.

**(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात अधिघोषीत)**

स्वा/—

(सायमा एन.ए.एस.शेख)

दिनांकः ०४.०६.२०२६ **२ रे न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,**